**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ४**

**<u>नि.फौ.ख.क्र. २१/२०२३</u>**

महाराष्ट्र शासन वि. देविदास व इतर

**नि.क्र. ४४**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नाव – रामचंद्र मनसाराम बालपांडे,

वय – ७१ वर्षे,

व्यवसाय – शेती,

राहणार – नरखेड, ता. नरखेड, जि. नागपूर

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.व्ही. यु. मिरचे यांच्यामार्फत शपथेवर सुरूः–</u>**

माझी भायवाडी, ता. नरखेड, जि. नागपुर येथे १.०९ हे.आर. शेती आहे. माझ्या शेतीच्या उत्तर बाजुला आरोपी क्र. १ देविदास ची शेती आहे. दि. ०६/१२/२०२२ रोजी आरोपींनी माझ्या शेतात पराटी कापली आणि त्यावरुन दि. ०७/१२/२०२२ रोजी भांडण झाले.

२. दि. ०७/१२/२०२२ रोजी सकाळी १०:०० वाजताच्या सुमारास मी, माझे दोन मुलं नामे रविंद्र आणि सुरेंद्र व मजुर कामगार नामे लक्ष्मीबाई कोहळे कामासाठी माझ्या शेतात गेलो. दुपारी ०२:०० च्या सुमारास माझा मुलगा राजेंद्र आणि माझी पत्नी नामे चंद्रकला हे दोघे शेतात आले. चौंघेही आरोपी भांडणाच्या तयारीत होते. रोजेंद्र आणि चंद्रकला यांचे व आरोपी क्र. १ ते ४ यांच्यामध्ये भांडण सुरु झाले. चौघेही आरोपींनी शिवीगाळ केली. आरोपी क्र. १ देविदास माझ्या पत्नीला म्हणाला की '' तुझ्या मायच्या पुदीत चोमनं. इथेच मर्डर करुन गाडुन टाकीन.'' आरोपी क्र. १ ते ४ नी माझा मुलगा राजेंद्र सोबत धक्काबुक्की केली. सदर घटना माझ्या व आरोपी क्र. १ देविदास च्या शेतामधील धु–

यावरील रस्त्यावर घडली. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझे बयान नोंदविले होते. मी आरोपींना बघितल्यावर ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर नाही.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. ए. एन. नारनवरे यांच्यामार्फत उलटपासः–</u>**

**३.** मी आरोपी क्र. १ देविदास ची आई श्रीमती. कमलाबाई राकेश यांना ओळखतो. मी गणपती उर्फ गणपतराव नासरे यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा राजेंद्रने गणपती उर्फ गणपतराव नासरे याच्याकडुन बेकायदेशीर रित्या शेती विकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे मुलं राजेंद्र व सुरेंद्र या दोघांनी गणपती उर्फ गणपतराव नासरे याच्याकडुन बेकायदेशीर रित्या घर विकत घेतले होते. हे मला माहित नाही की, श्रीमती. कमलाबाई शंकर राकेश यांनी माझ्या मुलांविरुध्द दिवाणी दावा दिवाणी न्यायाल, नरखेड येथे दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलांनी गणपती उर्फ गणपतराव नासरे यांच्याकडुन विकत घेतलेल्या घरात कमलाबाई राकेश राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, ०१/०२/२०२० रोजी मी, रजेंद्र बालपांडे, रविंद्र बालपांडे, रामचंद्र बालपांडे, शितल बालपांडे, तृषाली बालपांडे, चंद्रकला बालपांडे, साहेबराव खुरसंगे व इतर लोकं गैरकायद्याची मंडळी घेउन कमलाबाई राकेश राहत असलेले घर तोडून टाकले. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०७/१२/२०२२ पुर्वीपासुन माझे व आरोपींचे परिवारामध्ये शेती व घरामुळे वाद आहे. हे म्हणणे खरे नाही की, शेतामध्ये शेतकरी व मजुर सहसा सकाळी १० वाजता जातात आणि सायंकाळी ५ ते ६ वाजताच्या दरम्यान परत येतात. पोलीसांनी माझे बयान शेतात नोंदविले. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना बयान देतांना सांगितले होते की आरोपी क्र. १ ने माझ्या पत्नीला शिवीगाळ केली. मी पोलीसांना बयान देतांना सांगितले होते की, घटना धु–यावरील रस्त्यावर घडली. मी पोलीसांना माझ्या शेताचा ७/१२ चौकशीच्या वेळी दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासणी मध्ये सांगितल्या

प्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, शेती आणि घराच्या बद्दल पुर्वीचा वाद असल्यामुळे मी आज रोजी माझ्या मुलाच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

माझे समक्ष,

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2026.01.27 16:27:22 -0500

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2026.01.27 16:27:15 -0500

(रोहन विजयकुमार थाईल)

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नरखेड

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नरखेड, नागपूर.

**दिनांकः २७/०१/२०२६.**

**दिनांकः २७/०१/२०२६**

माझे सरतपासणी व उलटतपासणी चे पान नं. 01 ते 03 मला वाचून दाखविले व ते माझ्या सांगयाप्रमाणे आहे व **Explanation V, Paragraph No**. 16, **Chapter VI of Criminal Manual** प्रमाणे मला त्याचे विनामुल्य खरी नक्कल मिळालेली आहे.

साक्षीदाराची सही
(रामचंद्र मनसाराम बालपांडे)

विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता
(व्ही. यु. मिरचे)